## निवडक



**मडकई : महाशिवरात्रीनिमित्त भगवान श्री महादेवच्या रुपात सजविण्यात आलेली मडकईची श्री नवदुर्गा देवी.**

### जोस बटलर कर्णधारपदावरून पायउतार

**लाहोर, दि. १ :** इंग्लंडच्या जोस बटलरची एकदिवसीय आणि टी–२० स्वरूपातील संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये संघाच्या खराब कामगिरीनंतर बटलरने हा निर्णय घेतला. शनिवारी कराची येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गट फेरीच्या सामन्यात तो शेवटच्या वेळी संघाचे नेतृत्व करणार आहे. त्याने शुक्रवारी माध्यमांशी बोलताना या गोष्टीचा खुलासा केला. शुक्रवारी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत संबोधित करताना बटलरने कर्णधारपद सोडण्याबद्दल मोठी घोषणा केली. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक आणि २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये इंग्लंड संघ गट टप्प्यातच बाहेर पडला होता. त्यामुळे या कामगिरीमुळे इंग्लंड क्रिकेट असोसिएशन देखील नाराज झालेला आहे. बटलर म्हणाला, माझ्यासाठी कर्णधारपद सोडण्याची हीच योग्य वेळ आहे. संघासाठीही हीच योग्य वेळ आहे. मला आशा आहे की, एक नवीन खेळाडू संघाची धुरा सांभाळेल आणि प्रशिक्षक मॅक्युलमसोबत संघाला नवीन उंचीवर घेऊन जाईल. माझ्या कर्णधारपदासाठी चॅम्पियन्स ट्रॉफीचे निकाल खूप महत्त्वाचे होते. जेव्हा मॅक्युलम व्हाईट बॉल प्रशिक्षक झाला, तेव्हा मी त्याच्यासोबत काम करण्यास खूप उत्सुक होतो. मला आशा होती की संघ त्यांचे निकाल बदलेल आणि वेगाने पुढे जाईल. तथापि, ते होऊ शकले नाही, म्हणून मी कर्णधारपद सोडत आहे.

### साळ येथे उद्या 'तूं आई आहेस का?'

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. १ :** साळ येथील श्री महादेव भूमिका पंचायतन देवस्थानच्या वाढदिवसानिमित्त वर्ष पद्धतीप्रमाणे यंदा सोमवार दिनांक ३ मार्च रोजी नवशक्ती नाट्य मंडळ –साळ –मधलावाडा, पार नं. ३ च्या वतीने रात्री ठीक ११ वाजता चव्हाटेश्वर रंगमंच – खालचावाडा येथे गोकुळदास मुळवी लिखित शिवराम राऊत दिग्दर्शित कौटुंबिक जिव्हाळ्याचे सत्य घटनेवर आधारित संगीत सामाजिक तीन अंकी नाटक 'तूं आई आहेस का?' सादर केले जाईल. या नाट्यप्रयोगात कृष्णा परब, प्रणय देऊलकर, मंदार साळकर, हृदयनाथ ठाकूर, पांडुरंग परब , आनंद साळकर, शैलेश चंदगडकर, तन्मय ठाकूर, गोपी ठाकूर, विक्रम मोरजकर, कृष्णा राऊत, राजेंद्र नाईक, निवेदिता चंद्रोजी व सान्वी सूर्यकांत राऊत आदी कलाकार भाग घेणार आहेत. या नाट्यप्रयोगास संगीत दिग्दर्शन मधु सूर्या राऊत तर अर्जुन (बबन)आरोंदेकर हे तबला साथ करणार. ध्वनी संकलन चंदू गवस, पार्श्व संगीत योगेश तारी, सूचक पांडुरंग परब ते निर्माता कृष्ण (तातो) राऊत व दिनेश (देवा) राऊत हे आहेत. मंगळवार दि. ४ रोजी कला आणि संस्कृती खाते पणजी गोवा यांच्या संयुक्त सहकार्याने उत्सवी रंगभूमी उन्नती योजनेच्या सहकार्यातून श्री महादेव भूमिका सेल्फ हेल्प ग्रुप महिला मंडळ – साळ गोवा हे यशवंत रांजणकर लिखित अमर कोनाडकर दिग्दर्शित संगीत पौराणिक महान तीन अंकी नाटक संगीत 'अमृत मोहिनी' सादर केले जाईल. या नाट्यप्रयोगात मानसी राऊत, अक्षरा राऊत, शारदा आरोंदेकर, मुग्धा तारी, शालिनी परब, सीताली नाईक, प्रतीक्षा राऊत, गौरी भाईप, दीपा परब, दीप्पी राऊत, प्रतिमा परब आशा राऊत, सानिया राऊत, वैभवी परब, शुक्ला परब व दीपा वळवईकर आदी कलाकार सहभागी होणार आहेत. या नाटकाचे मूळ संगीतकार पंडित जितेंद्र अभिषेकी असून या नाट्यप्रयोगास प्रयोगाचे ऑर्गन साथ व संगीत दिग्दर्शक मधू राऊत, तबला साथ अर्जुन (बबन) आरोंदेकर, पाश्वसंगित साई कळंगुटकर, निर्मिती प्रमुख प्रतिमा परब, ध्वनी संकलन सुभाष शिरोडकर (बांदा) आधी आहेत.

### वेदांत क्रिकेट स्पर्धेचा आज अंतिम सामना विद्युत झोतात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १ :** वेदांत इलेव्हान आयोजित गोवा, सिंधुदुर्ग मर्यादित १६व्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना रविवार दि. २ रोजी रात्री ९ वाजता विद्युत झोतात खेळविण्यात येईल, असे क्लबचे अध्यक्ष विठ्ठल (आपा) वायंगणकर यांनी सांगितले. सदर सामने किरण पाणी पुलांनजीक आरोंदा येथे खेळविण्यात येईल. या स्पर्धेतील विजेत्या संघास रोख रु. १ लाख ११,२२२ व उपविजेत्या संघास रु. ५५,५५५ व अन्य बक्षिसे व चषक देण्यात येईल. तरी क्रिकेट रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष वायंगणकर यांनी केले आहे.

### पर्येतील सातेरी ब्राह्मणी माया देवीचा आज वर्धापनदिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १ :** घोल सावंतवाडा पर्ये–सत्तरी येथील श्री सातेरी ब्राह्मणीमाया देवीचा ६वा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. २ रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित्त दुपारी १२ वा.आरती तीर्थप्रसाद, २ वाजता महाप्रसाद, संध्याकाळी ५ वाजता स्थानिक भजनी कलाकारांचे भजन, ७ वाजता दिंडी, रात्री ९ वाजता घुमट आरती, रात्री १०.३० वा. लहान मुलांचे नृत्य व कुणबी नृत्य, रात्री १२ वाजता ओंकार सोहम दशावतार नाट्य मंडळ मालवण राठीवडे गोंजीचीवाडी यांचे महान पौराणिक नाटक सादर होईल. ग्रामस्थांनी,भाविकांनी व नाट्य रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावावी, असे आवाहन देवस्थानतर्फे करण्यात आले आहे.

### मांद्रे येथे डॉ. शशांक मत्तेदारांचे गायन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १ :** मांद्रे येथील तबलापटू गुरुवर्य तुकाराम कोरगावकर यांच्या ओम साई राम संस्थेच्या विद्यार्थ्यांचे तबला सहवादन रविवार दि. २ रोजी संध्याकाळी ४ वाजता जील्हा पंचायत हॉल, मांद्रे येथे होणार आहे. ह्या कार्यक्रमात आकाश जलमि यांचे (संवादिनी एकल वादन), डॉ. उदय कुलकर्णी, धारवाड (तबला एकल वादन) व डॉ. शशांक मत्तेदार, पुणे यांचे (शास्त्रीय गायन) होणार आहे. त्यांना साथ संगत तुकाराम कोर गावकर, प्रसाद गवस, अमर मोपकर, साहिल म्हामल, पुनीत गडेकर तर उद्देश पेडणेकर यांचे निवेदन आहे. तरी संगीत प्रेमी रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# आफ्रिकेचा इंग्लंडवर सोपा विजय

## रॅसी व्हॅन डेर ड्युसेन, क्लासेनची अर्धशतके | ब गटात गाठले अव्वल स्थान

**लाहोर, दि. १ :**

दक्षिण आफ्रिकेने आपली दमदार कामगिरी सुरू ठेवत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत सहज प्रवेश केला आहे. गट टप्प्यातील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा एकतर्फी सामन्यात ७ गडी राखून आणि १२५ चेंडू राखून पराभव केला आणि अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले. सामना संपण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेने उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली होती, मात्र या विजयासह त्यांनी ब गटात पहिले स्थान मिळवले.

कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर शनिवारी हा सामना दुसरा उपांत्य फेरीतील संघ ठरवण्यासाठी खेळवला गेला. पण दक्षिण आफ्रिकेचे उपांत्य फेरी गाठणे जवळपास निश्चित झाले होते. अफगाणिस्तानला उपांत्य फेरी गाठण्यासाठी इंग्लंडला दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय आवश्यक होता. पण दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात आपल्या गोलंदाजीच्या जोरावर ही शक्यता संपुष्टात आणली आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर संघाच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी करत सहज लक्ष्य गाठले.

इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलर याने इंग्लंडची वनडे क्रिकेटमधील कामगिरी पाहता वनडे संघाचा कर्णधार म्हणून राजीनामा दिला. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत त्याने हा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाविरूद्धचा त्याचा वनडे संघाचा कर्णधार म्हणून हा अखेरचा सामना होता, पण या सामन्यात लाजिरवाण्या पद्धतीने संघ पराभूत झाला.




इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय अगदी चुकीचा ठरला. इंग्लंड संघ आफ्रिकेच्या भेदक गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकला नाही. संघातील एकही खेळाडू ४० धावाही करण्यात अपयशी ठरला. जो रूटने सर्वाधिक ३७ धावांची खेळी केली. तर इतर सर्व फलंदाज २०–२५ धावा करत बाद झाले आणि परिणामी संघ १७९ धावांमध्ये सर्वबाद झाला. आफ्रिकेकडून मार्को यान्सन आणि वियान मुल्डर यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतले. तर केशव महाराज २ विकेट आणि एनगिडी–रबाडाने प्रत्येकी १ विकेट घेतली.

इंग्लंडच्या संघाने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने अवघ्या २९ षटकांत विजय मिळवला. रायन रिकल्टनने २५ चेंडूत २७ धावा केल्या, तर ट्रिस्टन स्टब्स खातेही न उघडता आर्चरच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर रॅसी व्हॅन डेर ड्युसेनने ३ षटकार आणि ६ चौकारांसह सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली. तर दुखापतीतून परतलेल्या हेनरिक क्लासेनने ५६ चेंडूत ११ चौकारांसह ६४ धावांची खेळी करत संघाचा विजय निश्चित केला. तर डेव्हिड मिलरने विजयी षटकार लगावत संघाला मोठा विजय मिळवून दिला.

# पिळगाव येथे मराठी भाषा गौरव दिवस उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १ :** गोवा मराठी अकादमी डिचोली प्रभाग व सम्राट क्लब मये यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिवस पिळगाव येथील आयडियल हायस्कूलच्या सभागृहात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात गायत्री पाटील, राणी नाईक, गिरीजा सावंत व सुवर्णा परब यांनी सादर केलेल्या स्वागतनृत्याने झाली. कार्यक्रमाचे उद्‍घाटन प्रमुख पाहुणे प्राचार्य अनिल सामंत, आयडियल हायस्कूल पिळगावचे संस्थापक रामचंद्र गर्दे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गावकर, डिचोली प्रभागाचे अध्यक्ष प्रा. सोमनाथ पिळगांवकर, सम्राट क्लबचे अध्यक्ष ॲड. अजय प्रभु गावकर, समिक्षा शिरोडकर व कार्यक्रम प्रमुख शुभलता कळंगुटकर यांच्या हस्ते समई प्रज्वलन करून करण्यात आले. सोमनाथ पिळगांवकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पुष्प देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

प्राचार्य अनिल यांनी सांगितले की, जीवनामध्ये कितीही संकटे आली, तरी त्याविरुद्ध लढाई करणे व सकारात्मक दृष्टीकोन बाळगणे हे आपल्याला कवी कुसुमाग्रज यांचे साहित्य शिकवते. जीवन म्हणजे प्रकाशाची पूजा झाली पाहिजे.

यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात साईप्रणव राऊळ व रुही गर्दे (वेशभूषा व अभिनय) जान्हवी पार्सेकर व रुबिना शेख (कविता सादरीकरण) मधुर परब व मयंक पिळगावकर (संवादिनी वादन) श्रीराम कळंगुटकर व श्री शांतादुर्गा संगीत कला मंच बोर्डेचे विद्यार्थी (तबला वादन) जुई गर्दे (कथाकथन) व ज्ञानेश्वर गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयडियल हायस्कूलच्या निवडक विद्यार्थ्यांनी गीतरामायण सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी आचल नाईक हिने अप्रतिम असे नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्यासपीठावरील इतर मान्यवरांच्या हस्ते सर्व कलाकारांना अकादमीच्या वतीने स्मृतिचिन्हे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल मळीक व शुभलता कळंगुटकर यांनी केले.



**मोपा : राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विविध प्रकल्पांची माहिती देताना विद्यार्थी, मुख्याध्यापक महेश कशालकर शिक्षिका गीता नागवेकर, संजना शेट्ये व शिक्षकवर्ग.**

# सरकारी विद्यालय मोपा शाळेत विज्ञान दिन उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १ :** सरकारी विद्यालय मोपा शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विज्ञान विषयक प्रयोगांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यानी करून वैज्ञानिक गुणांचे सादरीकरण केले. तसेच विज्ञान विषयक वेगवेगळ्या प्रतिकृती प्रदर्शित करण्यात आले.

उच्च प्राथमिक विभागाचे विद्यार्थी श्रावणी राऊळ, स्वरानंद गाड, ओंकार परब, पलक सावंत, ओवी आयीर, एकांषा नाईक, पूर्वी राऊळ, आयुष नाईक, तनया परब, गार्गी सावंत, तनया समीर परब, आरोही सावंत या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वैज्ञानिक प्रकल्पांची माहिती दिली.

दैनंदिन जीवनात आपण विज्ञानाचा वापर करून आपली कामे जलद व सोप्या पद्धतीने काशी करू शकतो. याची माहिती मुख्याध्यापक महेश कशालकर यांनी दिली. विज्ञान शिक्षिका गीता नागवेकर यांनी विज्ञान दिन व सी. व्ही. रमन यांची माहिती दिली. विज्ञान दिनानिमित्ता विद्यार्थ्यांसाठी भित्तिपत्रके तयार करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेतील विजेत्यांना शिक्षिका गीता नागवेकर यांनी आकर्षक बक्षिसे दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक संदीप आसोलकर, संजना शेट्ये, शीतल महाले, सोनल नावेलकर, पुजा नाईक आदींनी मोठे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सोनल नावेलकर तर आभार पुजा नाईक यांनी मानले.

# साखळी हेडगेवार विद्यामंदिरात 'राष्ट्रीय विज्ञान दिवस'

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १ :** साखळी येथील डॉ. के.ब. हेडगेवार विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय महाविद्यालय, खांडोळा येथील रसायनशास्त्र प्राध्यापक डॉ. अपूर्वा नार्वेकर उपस्थित होत्या. शाळा व्यवस्थापन समितीचे खजिनदार उल्हास केरकर आणि मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सर सी. ही. रमण यांना आदरांजली अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थी कनिष्क बेटकीकर यांनी 'दैनंदिन जीवनातील कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर परिसंवाद सादर केला. विद्यार्थ्यांनी 'इन विट्रो फर्टिलायझेशन' या विषयावर नाटक सादर केले.

मागील आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद स्पर्धा, पोस्टर रेखाटन स्पर्धा आणि प्रश्नमंजूषा स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धांच्या विजेत्यांना आणि विविध ऑलिम्पियाडमधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.



**साखळी : हेडगेवार विद्यामंदिरात 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' कार्यक्रमात साजरा करण्यात आला.**

मुख्य पाहुण्यांनी विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाचे उद्‍घाटन केले, जिथे विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, शाश्वत विकास आणि नैसर्गिक चिकित्सा यांवरील प्रकल्प प्रदर्शित केले. मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांनी प्रस्तावना दिली. श्रेया बर्वे यांनी सूत्रसंचालन केले, आकर्षा वारखंडकर यांनी बक्षीस वितरणावेळी निकाल जाहीर केले, आणि पूनम शिरोडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत केसरबाई केरकर विद्यालय विजेते

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १ :** केरी – फोंडा येथील सुरश्री केसरबाई केरकर विद्यालय संघाच्या विद्यार्थिनींनी फातोर्डा, मडगाव गोवा येथे आयोजित जिल्हा स्तरावरील टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात जेतेपद पटकावले. तसेच जिल्हास्तरावरील चेंडू फेकण्याच्या क्रीडासत्रात १४ वर्षांखालील मुलींच्या गटाने व १७ वर्षांखालील मुलांच्या गटाने जेतेपद मिळविले.

या स्पर्धेचे आयोजन गोव्याच्या क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने केले होते.

स्पर्धेत सुरश्री केसरबाई केरकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून जेतेपद मिळवले. १४ वर्षांखालील मुलींचा क्रिकेट गटात तनिष्का गावडे, तनया



**केरी–फोंडा : जिल्हास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद मिळविलेला सुरश्री केसरबाई केरकर विद्यालयाच्या मुलींच्या संघासोबत उषा नाईक, संकेत गावकर व इतर.**

गावडे, तेजल गावडे, हौशी नाईक, धृतिका गावडे, श्रुती कोलेकर, परिधी गावडे, निहारिका केरकर, गायत्री पालकर, रुत्विका जल्मी, सुहानी गावडे, खुशबू सतरकर, मनस्वी गावकर, द्वारिका कोलेकर यांनी भाग घेतला. १४ वर्षांखालील मुलींचा चेंडू फेक गट तेजल गावडे, तनया गावडे, तनिष्का गावडे, श्रुती कोलेकर, समृद्धी गुरव, रिया नाईक, राधिका कोलेकर, प्रियंका गावडे, निराली गावडे, परिधी गावडे, निहारिका केरकर, प्रांजली गावडे, सिमरान नाईक. १७ वर्षांखालील मुलांचा चेंडू फेक गटात मयुरेश जल्मी, रितेश कोलेकर, श्रेयस गावडे, हर्ष गावडे, दिशांत गावडे, हशवेश जल्मी, विघ्नेश कोलीकर, रतीश गावडे, निशित गावडे, दत्ताराम केरकर, तेजस नाईक, सिद्धांत गावडे व वेदांत गावडे केरकर यांनी भाग घेतला.

या विद्यार्थ्यांना शाळेतील क्रिडाशिक्षक संकेत गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले गेले. त्यांच्या कष्ट आणि मेहनतीचा परिपाक म्हणून त्यांनी ही सफलता मिळवली.

शाळेच्या मुख्याध्यापिका उषा नाईक, सेत्रो एदुकादोर संस्थेचे अध्यक्ष संजय प्रियोळकर, व्यवस्थापन सदस्य आणि पालकांनी जेतेपद मिळवलेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. त्यांच्या कष्टाचे व कौशल्याचे कौतुक करत शाळेच्या सर्व क्रिडाप्रेमींनी त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे स्वागत केले.



# विकास हायस्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १ :** वळपे पेडणे येथील विकास हायस्कूलमध्ये नुकताच मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला यावेळी व्यासपीठावर शिक्षक प्रतिनिधी रत्नाकर राव, ज्येष्ठ शिक्षिका विना देसाई उपस्थित होत्या. मान्यवरांनी कवी श्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. या दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेवर आधारित काही स्पर्धांचे आयोजन करण्यात आले यात हायस्कूलच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी सर्वप्रथम सुंदर हस्ताक्षर लेखन व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर लहान गट व मोठा गट साठी वाचन स्पर्धा व मराठी कविता गायन स्पर्धा घेण्यात आल्या दोन्ही स्पर्धांचे परीक्षण नीला गडेकर व विश्वनाथ तोरस्कर यांनी केले. यावेळी शिक्षिका शारदा परब कवी श्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रसिद्ध साहित्यांचा आढावा घेऊन मुलांना काही प्रश्न विचारून त्यांच्या सामान्य ज्ञान अजमावले. शिक्षक नंदादीप आंबेकर यांनी मराठी बद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका शारदा परब यांनी केले

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 178 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .